तरुण भारत ▫ मंगळवार, २३ ऑक्टोबर २०१८

# वाचनाने माणसाचे अज्ञान नष्ट होते : प्रा. कृष्णात खोत

**कोल्हापूर :** माणसं वाचता येण्यासाठी आणि जग कळण्यासाठी पुस्तकांवर प्रेम केले पाहिजे. नुसतेच प्रेम न करता पुस्तकं वाचून ती समजून घेतली पाहिजेत. तरच माणसाचे अज्ञान नष्ट होईल आणि तो गुलामगिरीतून मुक्त होईल, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक प्रा. कृष्णात खोत यांनी केले. विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. विवेकानंद कॉलेजच्या ग्रंथालय, मराठी विभाग व वाङ्मय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. कलाम जयंती, वाचन प्रेरणा दिनानिमित्त कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.यावेळी प्रा. डॉ. प्रभावती पाटील, प्रा. डॉ. प्रदिप पाटील, डॉ. शर्मिला घाडगे, प्रा. यु. आर. हिरकुडे, प्रा. एम. पी गवळी आदी उपस्थित होते. ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दीपक तुपे यांनी आभार मानले. प्रा. डॉ. प्रभावती पाटील, डॉ. प्रदिप पाटील, डॉ. शर्मिला घाडगे, प्रा. गवळी आदी उपस्थित होते. डॉ. नीता पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दीपक तुपे यांनी आभार मानले.

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 KOLHAPUR

मराठी भाषा संवर्धन पंधरवडा (१ ते १५ जानेवारी २०१९)
मराठी विभाग - कविसंमेलन
दै. महाराष्ट्र टाईम्स
(दि. ०४/०१/२०१८)

कोल्हापूर TIMES

# 'विवेकानंद'मध्ये रंगले कविसंमेलन

कोल्हापूर टाइम्स टीम

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त विवेकानंद कॉलेजच्या मराठी विभागाने कविसंमेलनाचे आयोजन केले. पुण्यातील कवी प्रा. विजय अंधारे यांनी बहारदार कवितांचे सादरीकरण करून, उपस्थितांना अंतर्मुख केले.

एक जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा केला जातो. विवेकानंद कॉलेजमधील मराठी विभागात कविसंमेलनाने भाषा पंधरवड्याची सुरुवात झाली. पुणे येथील कवी प्रा. विजय अंधारे यांनी विविध विषयांवरील कवितांचे सादरीकरण केले. यावेळी बोलताना ते म्हणाले, 'कवितेत सामाजिक जाणिवा असतात. माणसांच्या जगण्याला कलाटणी देण्याची ताकत कवितांमध्ये असते. संवेदनशील मनास कविता समृद्ध बनवतात, त्यामुळे काव्यवाचन करणे गरजेचे आहे.'

कविसंमेलनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी मनोगत व्यक्त केले. मराठी विभागप्रमुख प्रा. बी. के. गोसावी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. डी. आर. तुपे, प्रा. डॉ. प्रदीप पाटील, प्रा. एम. व्ही. चामे, आदी उपस्थित होते. डॉ. आरिफ महात यांनी गजल सादरीकरण केले. प्रियांका खोत या विद्यार्थिनीने आभार मानले.

अमित गद्रे

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD. JUNE 1964

तरुण भारत

, सोमवार, १४ जानेवारी २०११

## स्वामी विवेकानंद कॉलेज

राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.एस. वाय.होनगेकर होते. यावेळी प्रा.युवराज गो[illegible]ले यांनी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या कार्याची माहिती सांगितली. स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावरील विविध पुस्तकांचे प्रदर्शन व वाचन कट्याचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक प्रा.बी.के.गोसावी यांनी तर आभार डॉ.निता पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा.समीक्षा फराकटे यांनी केले.

VIVEKANAND COLLEGE
ESTD. JUNE 1964
UR-416003

महाराष्ट्र टाइम्स

## अंधशाळेत कार्यक्रम

कोल्हापूर : स्वामी विवेकानंद कॉलेजमधील मराठी विभागातील विद्यार्थिनींनी ज्ञानप्रबोधिनी संचलित अंधशाळेतील मुलांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला. या उपक्रमाबाबत प्रा. डॉ. प्रदीप पाटील यांनी माहिती दिली. ओंकार बुचडे याने स्वागत केले. विद्यार्थिनींना प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, मराठी विभाग प्रा. बी. के. गोसावी यांचे प्रोत्साहन लाभले.

## माचाळ मोहीम

कोल्हापूर : स्वामी विवेकानंद कॉलेजच्या एनसीसी विभागाच्यावतीने विशाळगड ते माचाळ पदभ्रमंती उपक्रमाचे आयोजन केले होते. उपक्रमात सहभागी विद्यार्थी, प्राध्यापकांनी विशाळगड ते माचाळ या मार्गावरील २४ किलोमीटर अंतर यशस्वी पार केले. पदभ्रमंतीअंतर्गत वन्यजीव व वनस्पतींची माहिती घेतली. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, लेफ्टनंट डॉ. एस. जी. गावडे व कॅप्टन सुनीता भोसले यांनी नेतृत्व केले. मटा

लोकमत
कोल्हापूर, मंगळवार, दि. ३१ जुलै २०१८ | ३

# विवेकानंदमध्ये वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये वाङ्मय मंडळाचे उद्घाटन विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. राजन गवस यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. प्रा. डॉ. दीपक तुपे यांनी प्रास्ताविक , बी. के. गोसावी यांनी परिचय करून दिला.

VIVEKANAND COLLEGE
ESTD. JUNE 1964
KOLHAPUR-416003

लोकमत

# समृद्ध जगण्याचे भान साहित्यातून : गोसावी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिक्षण आणि समाजजीवनामध्ये साहित्याचे योगदान फार मोठे आहे. मराठी भाषेने मला भरभरून साहित्य वाचायला दिले. माझ्या जीवनाच्या अनुभूतीची व्याप्ती वाढविली. आजच्या विद्यार्थ्यांनी दर्जेदार साहित्यकृती वाचून आपल्या जाणीवा प्रगल्भ केल्या पाहिजेत. समृद्ध जगण्याचे भान साहित्यातून येते, असे मत प्रा. भाऊसाहेब गोसावी यांनी व्यक्त केले.

विवेकानंद महाविद्यालय येथे आयोजित 'मराठी भाषासंवर्धन पंधरवडा दिना'निमित्त 'मला साहित्याने काय दिले?' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी विभागातील प्रा. डॉ. शर्मिला घाटगे होत्या.

प्रा. गोसावी म्हणाले, आज मराठी भाषेचा विकास करायचा असेल तर शिक्षण, समाजकारण, राजकारण याचबरोबर सरकारी कार्यालये व इतर कार्यालयांतही मराठीचा वापर केला पाहिजे. भाषा माणसाला जगायला आणि घडायला शिकविते. यासाठी दर्जेदार ग्रंथसंपदा विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणाऱ्या माध्यमांचा वापर केला पाहिजे. मराठी भाषाविकासाच्या दृष्टीने सर्वांनीच सजगपणे प्रयत्नशील राहून भाषासमृद्धीसाठी योग्य ती उपाययोजना केली पाहिजे.

अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. घाटगे यांनी मराठी भाषा व साहित्य यांवर मौलिक विवेचन केले.

प्रिया बुराण हिने प्रास्ताविक केले. अनिकेत पाटील यांनी आभार मानले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आय. होनगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभागातर्फे या कार्यक्रमाचे संयोजन केले होते.

Hello Kolhapur
Page No. 7 Jan 09, 2019
Powered by: erelego.com

VIVEKANAND COLLEGE
ESTD. JUNE 1964
KOLHAPUR-416003